NSE

नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड
'एक्सचेंज प्लाझा', बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-400 051

# सार्वजनिक सूचना

**कंपन्यांच्या इक्विटी शेअर्सचे कंपल्सरीली डीलिस्टींग करण्यासाठी सेबी (इक्विटी शेअर्स डीलिस्टींग करणे) रेग्युलेशन 2021 यातील नियमन, 32 (3) अनुसार सार्वजनिक सूचना -**

सेबी (इक्विटी शेअर्स डीलिस्टींग करणे) रेग्युलेशन 2021 यातील नियमन 32 (3) नुसार, ('डीलिस्टींग रेग्युलेशन') आणि सेक्युरिटीज कॉंट्रॅक्टस (रेग्युलेशन) ॲक्ट ,1956 कलम 21 ए च्या नियमांनुसार, तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिडेटच्या ("द एक्सचेंज")नियम,उप-विधी आणि नियमनानुसार सूचना देण्यात येते की, एक्सचेंजने खाली सूचित केलेल्या दोन कंपन्यांना डीलिस्ट करण्याचा प्रस्ताव दिला आहे. कारण इतर गोष्टींबरोबरच या कंपन्यांनी आपल्या सेक्युरिटीज् डीलिस्ट करण्यासाठी, आधार तयार केला आहे - जसे की, या लिक्विडेशनमध्ये निघालेल्या कंपन्यांच्या सेक्युरिटीजचे व्यवहार सहा महिन्यांपेक्षा अधिक काळापासून निलंबित आहेत.

एक्सचेंजने या दोन्ही कंपन्यांना त्यांच्या अखेरीस ज्ञात असलेल्या पत्त्यावर आणि एक्सचेंजकडे असलेल्या नोंदीनुसार नोंदणीकृत ई मेल पत्त्यावर शो कॉज म्हणजेच 'कारणे दाखवा' नोटिसा बजावल्या आहेत. तुमच्या कंपनीचे इक्विटी शेअर्स एक्सचेंजमधून कंपल्सरीली डीलिस्टेड का करू नयेत, याची कारणे देण्यास सांगितले आहे. प्रस्तुत कंपन्यांची यादी एक्सचेंजकडे असलेल्या शेवटच्या नोंदींनुसार पत्त्यासह खाली नमूद केली आहे.

| अनुक्रम | कंपनी | *कंपनीचा नोंदणीकृत पत्ता |
|---|---|---|
| 1 | नितिन फायर प्रोटेक्शन इंडस्ट्रिज लिमिटेड# | 501, डेल्टा टेक्नॉलॉजी स्ट्रीट, हिरानंदानी गार्डन्स , पवई, मुंबई - 400076 |
| 2 | कॉक्स अँड किंग्सज लिमिटेड# | टर्नर मॉरिसन बिल्डींग, पहिला मजला, 16 बँक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - 400001 |

* पत्ता, एक्सचेंजच्या नोंदीमध्ये असलेल्या उपलब्धतेनुसार दिलेला आहे.

\# या कंपन्या लिक्विडेशनमध्ये गेल्या असल्यामुळे, डीलिस्टींग नियमन - नियम 34चे परिणाम या कंपन्यांना लागू होणार नाहीत.

कंपल्सरीली डीलिस्टींगच्या परिणामांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश असणार आहे.

- वरील कंपन्यांचे स्टॉक एक्स्चेंजवर लिस्टींग होणे बंद केले जाईल. या कंपन्यांना बोर्ड ऑफ स्टॉक एक्सचेंजच्या डिसेमिनेशनकडे वर्ग केले जाईल.

- डीलिस्टींग नियमनाच्या नियम 34 नुसार अटी पुढीलप्रमाणे ---

  1. डीलिस्टींग झालेली कंपनी, तिचे पूर्ण-वेळ डायरेक्टर , सेक्युरिटीज् कायद्याचे पालन सुनिश्चित करण्यासाठी जबाबदार व्यक्ती, तिचे प्रमोटर्स आणि त्यांच्यापैकी कोणाकडूनही प्रमोट केलेल्या कंपन्यांना सेक्युरिटीज मार्केटमध्ये प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे प्रवेश करता येणार नाही किंवा लिस्टींग करण्यासाठी विनंती अथवा प्रयत्न करू शकणार नाहीत. तसेच त्यांना डीलिस्टींग झालेल्या तारखेपासून दहा वर्षांच्या कालावधीत सेक्युरिटीज मार्केटमध्ये मध्यस्थ म्हणून काम करता येणार नाही.
  2. ज्या कंपनीची फेअर व्हॅल्यू सकारात्मक आहे, अशा कंपनीच्या बाबतीत -
     a. अशी कंपनी आणि त्यांचे डिपॉझिटरीज यांनी प्रमोटर/प्रमोटर्स ग्रुपकडे असलेल्या कोणत्याही इक्विटी शेअर्सचे ट्रान्सफर - सेल करणे, प्लेज ठेवणे इत्यादी करू नये आणि प्रमोटर /प्रमोटर्स ग्रुपने धारण केलेल्या इक्विटी शेअर्सचा बोनस, राइट इक्विटी शेअर्सचे,बोनस इक्विटी शेअर्सचे विभाजन इत्यादी कॉर्पोरेट लाभ घेण्याचे अधिकार गोठविण्यात आले आहेत.जोपर्यंत नियमावली 33च्या उप-नियम (4) चे पालन करून, अशा कंपनीचे प्रमोटर पब्लिक इक्विटी शेअर्सना संबंधित स्टॉक एक्सचेंजने प्रमाणित केल्यानुसार, बाहेर पडण्याचा पर्याय प्रदान करत नाहीत.

     b. कंपल्सरीली डीलिस्टींग केलेल्या कंपनीचे प्रमोटर, पूर्ण-वेळ डायरेक्टर आणि सेक्युरिटीज कायद्याचे पालन सुनिश्चित करण्यासाठी जबाबदार व्यक्ती (अनेक व्यक्ती) देखील कलम (ए) मध्ये नमूद केल्याप्रमाणे बाहेर पडण्याचा पर्याय देईपर्यंत कोणत्याही लिस्टेड कंपनीचे डायरेक्टर बनण्यास पात्र असणार नाहीत.

- डिलिस्टींग नियमनाच्या नियम 33 नुसार अटी पुढीलप्रमाणे ---

  1. जेव्हा एखाद्या कंपनीचे इक्विटी शेअर्स एखाद्या मान्यताप्राप्त स्टॉक एक्स्चेंजद्वारे डीलिस्टींग केले जातात, तेव्हा मान्यताप्राप्त स्टॉक एक्स्चेंज स्वतंत्र व्हॅल्यूअरची नियुक्ती करेल, जो डीलिस्टींग इक्विटी शेअर्सची फेअर व्हॅल्यू निर्धारित करेल.
  2. मान्यताप्राप्त स्टॉक एक्स्चेंज, तज्ज्ञ व्हॅल्यूअरांचे एक पॅनेल तयार करेल आणि त्या पॅनेलमधून, उप-नियम (1) च्या हेतूंसाठी व्हॅल्यूअर नियुक्त केले जातील.
  3. डीलिस्टींग इक्विटी शेअर्सची व्हॅल्यू सेबी (डिलिस्टींग ऑफ इक्विटी शेअर्स) नियमन, 2021 च्या- नियमन 20 च्या उप -नियम (2) मध्ये नमूद केलेल्या घटकांचा विचार करून व्हॅल्यूअरद्वारे निर्धारित केली जाईल.
  4. कंपनीचे प्रमोटर (एकापेक्षा अधिक प्रमोटर) पब्लिक शेअर होल्डर्सकडून डीलिस्टेड इक्विटी शेअर्स, मान्यताप्राप्त स्टॉक एक्स्चेंजमधून डीलिस्टींग केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत, व्हॅल्यूअरने निर्धारित केलेले व्हॅल्यू देऊन विकत घेतील. मात्र पब्लिक शेअर होल्डर्सकडे त्यांचा इक्विटी शेअर्समधला हिस्सा अबाधित ठेवण्याचा पर्याय असेल.
  5. कंपल्सरीली डीलिस्टींगच्या ' ऑफर' अंतर्गत ज्यांनी इक्विटी शेअर्स देवू केले आहेत, त्यांना नियमन 33 च्या उप-नियम (3) नुसार देय किंमत, नियम 33 च्या उप-नियम (4) अंतर्गत निर्दिष्ट केलेल्या वेळेत दिली नाही, तर अशा सर्व इक्विटी शेअर्स होल्डर्सना वार्षिक दहा टक्के दराने इंटरेस्ट देण्यास प्रमोटर्स बाध्य आहेत.

\# या कंपन्या लिक्विडेशनमध्ये गेल्या आहेत आणि म्हणून:-

a. सेबीच्या सर्क्यूलर नं. SEBI/HO/CFD/DCR/CIR/P/2016/81 दिनांक 07 सप्टेंबर 2016, मधील तरतुदी या कंपनीला लागू होणार नाहीत.

b. या संदर्भात लिक्विडेशनमध्ये असलेल्या कंपन्यांसाठी सेबीकडून खालील निर्देश प्राप्त झाले आहेत:-

   1. जर कंपनीवर हंगामी लिक्विडेटरच्या नियुक्तीपूर्वी किंवा कंपनी कारभार गुंडाळण्याच्या (वाइंडिंग अप) आदेशापूर्वी एखाद्या कंपनीला कंपल्सरीली डीलिस्टींग केले गेले असल्यास, डीलिस्टींग नियमनच्या नियम 34 अंतर्गत प्रदान केलेले निर्बंध लागू होतील.

   2. हंगामी लिक्विडेटरच्या नियुक्तीपूर्वी किंवा कंपनीचा कारभार गुंडाळण्याच्या आदेशापूर्वी एखादी कंपनी कंपल्सरीली डीलिस्टींग केली गेली नसेल तर, डीलिस्टींगची प्रक्रिया डीलिस्टींग नियमनच्या कायद्याच्या अंमलबजावणीनुसार होईल आणि डीलिस्टींग नियमन, नियम 34 मधील निर्बंध लागू होणार नाहीत.

प्रस्तावित डीलिस्टींगमुळे बाधित असलेली कोणतीही व्यक्ती 25 नोव्हेंबर 2022 रोजी किंवा त्यापूर्वी एक्सचेंजच्या डीलिस्टींग कमिटीकडे लेखी निवेदन करू शकते.

असे रिप्रेझेंटेशन (रिप्रेझेंटेशन करणारे अनेकजण) करणाऱ्या व्यक्तिंच्या (अनेक व्यक्तींच्या) संपूर्ण संपर्क तपशीलांसह, खालील पत्त्यावर पाठविण्यात यावे.

द डिलिस्टिंग कमिटी, एनफोर्समेंट डिपार्टमेंट, नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड 'एक्सचेंज प्लाझा•, सी-1, ब्लॉक-जी, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई 400 051.

संपर्क क्रमांक: +91 22 26598100 (23462) ,

ई-मेल: dl-insp-enf-delisting@nse.co.in.

**स्थळ : मुंबई** **दिनांक : 3 नोव्हेंबर, 2022**

Nifty50